## विषबाधा मेलेल्या प्राण्यावर किंवा पाण्यात झाल्यास...

- मयत पक्षी/किडे पाण्याजवळ किंवा मयत प्राण्याजवळ आढळल्यास फोनद्वारे माहिती वनविभागाला द्या.
- पाण्याला व मयत प्राण्याला हात लाऊ नका.
- त्या क्षेत्राला झुडुपे व काटे लाऊन प्रतिबंधित करा.
- कोणताही प्राणी त्या प्राण्याजवळ व पाण्याजवळ जाऊ नये हे निश्चित करा कारण अन्य प्राणी विषबाधेचे शिकार होतात.

## दुसऱ्या प्रदेशातील लोक व शिकारी गावाजवळ अथवा जंगलाजवळ दिसल्यास...

- ते कुठले व जंगल/गावाजवळ का आहेत याची माहिती घ्या.
- फोनद्वारे माहिती वनविभागाला द्या.
- ओळखपत्र व मोबाईल क्रमांक तपासून पहा.
- त्यांना वन्यप्राण्यांबद्दल कोणतीही माहिती देऊ नका.
- त्यांचे छायाचित्र घ्या.
- गावातील लोहाराकडे लक्ष ठेवा तो फासे बनवू शकतो.
- गावातील गुराख्याकडून शिकारी व मासभक्षी प्राण्यांच्या वर्दळीची माहिती घ्या.

